वादी करीता सा.क्र.१

**<u>निशाणी क्रं. ५० वरील आदेशानुसार उर्वरीत उलटतपास प्रतिवादीकरीता उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एच.पौळ यांच्या वतीने शपथेवर पून्हा सुरू</u>**

२०. माझे ४ थी वर्गापर्यंत शिक्षण झाले. मला लिहता वाचता येते. ठराव पत्राचा मुद्रांक नेमक्या कोणत्या तारखेस घेतला होता ते मला आठवत नाही, साक्षीदार पुन्हा स्वत: सांगतात खरेदीखतादिवशीच घेतला होता. ठरावपत्राच्या मुंद्राकवर लिखाई ज्या दिवशी मुद्रांक घेतला होता त्याच दिवशी झाली. ठरावपत्राचा मुद्रांक किसनरायाजीने रंगराव सुर्यवंशी यांच्या हक्कात करुन दिलेल्या खरेदीखतादिवशी घेतला होता, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात ती जमीन मी स्वत: घेतली होती परंतु माझेकडे रक्कम उपलब्ध नसल्यामुळे रंगराव सुर्यवंशी याच्या हक्कात पोकळ खरेदीखत झाले. खरेदीखताच्या दोन दिवसापूर्वीच किसनरायाजी व माझेमध्ये तोंडी ठराव झाला होता. किसनरायाजी सोबतचा ठराव सकाळी १०.०० वाजता, आमच्या घरी झाला होता. त्या ठरावाला साक्षीदार पांडूरंग नामदेव रायाजी, भानुदास भिमराव बिरादार हे हजर होते. किसनरायाजी बाबतचा ठराव हा रक्कम रुपये ६२,२००/– ला दोन एकर दोन गुंठे जमीन खरेदी विक्रीचा होता. मी त्यावेळी इसारा रक्कम रुपये १०० दिली होती. उर्वरीत मोबदला रक्कम दोन दिवसांने देण्याचे ठरले होते. किसनरायाजीसोबतच्या ठरावाच्या वेळी ती जमीन दोन ते तीन वर्षापासून पुर्वीपासून माझे ताब्यात

होती. ती जमीन वाटयाने माझे ताब्यात होती.

२१. किसरायाजीने रंगराव सुयर्वशी यांना करुन दिलेला बयानामाचे काम पूर्ण दुपारी सुमारे २ वाजता झाले. किसरायाजीने रंगराव सुयर्वशी यांना खरेदीखताच्या ठरावाच्या दिवशी ती दावा जमीन ताब्यात दिली. किसरायाजीने रंगराव सुयर्वशी यांना शेती दुरुस्तीसाठी जमीन विक्री केली हे म्हणणे खरे आहे. रक्कम रुपये ५०,०००/– च्या मोबदल्यात किसरायाजीने रंगराव सुयर्वशी यांना जमीन विक्री केली हे म्हणणे खरे आहे. रंगराव यांनी किसनरायाजी यांना रक्कम इसार म्हणून रूपये २७०००/– गावी व उर्वरीत मोबदला रुपये २३०००/– खरेदीखतावेळी दुयम निबंधकासमोर दिले हे म्हणणे खरे आहे.

प्रश्नः– किसनरायाजी व रंगराव सुयर्वशी यांच्या मधील ठरावावेळी तुम्ही हजर होते का ?

उत्तर :– त्यांच्यात ठरावाच झाला नाही.

माझे व रंगराव मधील ठरावात ती जमीन माझे ताब्यात ठेवावी व अर्धा माल रंगरावला दयावा असे ठरले होते. माझे सरतपासातील मजकुर हे जमीनीचा ताबा मला खरेदीखताच्या वेळी देण्याचे ठरले होते हा चुकीचा आहे.

२२. ठरावाचा मुद्रांक खरेदी करत असतांना मी नव्हतो. माझे व रंगराव मध्ये झालेला ठराव दुपारी २ ते ४ वाजण्याच्या सुमारास झाला. ठरावपत्र कोणत्या शाईने लिहले ते मी सांगू शकत नाही. ठरावपत्र पांडूरंग नामदेव रायाजी यांनी दुयम निबंधकाच्या कार्यालयासमोर झाडाखाली बसून लिहले. दुयम निबंधक कार्यालय त्यावेळेस नगर पालिकेच्या इमारतीमध्ये होते.

दुयम निबंधक कार्यालय १९९३ मध्ये नगर पालीकेच्या इमारतीत नव्हते हे म्हणणे खरे नाही. नगर पालिका इमारत त्यावेळी न्यायालयाच्या इमारती पासून उत्तरेकडे ५० ते १०० फुट अंतरावर आहे हे म्हणणे खरे आहे. दुयम निबंधक कार्यालय सन १९९३ ला न्यायालयाच्या इमारती पासून सुमारे १ किमी अंतरावर होते हे मी सांगू शकत नाही. माझे व रंगराव झालेल्या ठरावाच्या वेळी मी मोबदला रक्कम रुपये ६१०००/- रंगराव यांना दिल्यानंतर खरेदीखत करण्याचे ठरले होते. ठराव झालेनंतर रक्कम रुपये ६१०००/- माझेकडे दोन वर्षानी जमा झाली होती. रक्कम रुपये ६१०००/- घेवून खरेदीखत करुन दयावे म्हणून मी स्वत: रंगराव यांच्याकडे गेलो होतो. मी व रंगराव यांचेकडे रक्कम घेवून गेल्यांनतर त्यांनी खरेदीखत करुन देण्यास चालढकल केली.

प्रतिवादीचे विधिज्ञ श्री. ए.एच. पौळ यांच्या तोंडीविनंतीवरुन पुढील उलटतपास तहकुब.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.04.17 15:53:38 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक १७/०४/२०२६.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, निलंगा,
जिल्हा लातूर